 सहपत्र - A-1

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

**सभा व दप्तर कक्ष**

---

ज्ञानगंगा घरोघरी

# नियोजन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 45 |
| स्थळ | : | प्रशासकीय इमारत विद्यापीठ सभागृह (Offline/Online) |
| दिनांक | : | मंगळवार. 2 जुलै 2024 |
| वेळ | : | दुपारी 11 : 00 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

## 45 वी नियोजन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नियोजन मंडळाची बैठक क्र.45 (ऑनलाईन व ऑफलाईन), मंगळवार दि. 2 जुलै 2024 सकाळी 11.00 वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू | | अध्यक्ष |
| 02 | डॉ.जोगेद्रसिंह बिसेन, प्र-कुलगुरू | | सदस्य |
| 03 | डॉ. संजय बी. चौरडिया, संस्थापक अध्यक्ष, सुर्यदत्ता एज्यु. सोसा. पुणे | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | डॉ. जयदीप निकम, संचालक निरंतर शिक्षण विद्याशाखा | | सदस्य |
| 05 | डॉ. राम ठाकर, नियोजन अधिकारी व प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | | सदस्य |
| 06 | डॉ. मनोहर पाटील, प्राचार्य एस.एस.व्ही.पी. कॉलेज धुळे | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 07 | संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | | सदस्य |
| 08 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव | | सदस्य सचिव |

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | डॉ. अरविंद नारायण चौधरी, प्राचार्य कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय, बोदवड, जि. जळगाव | सदस्य |
| 02 | डॉ. दत्तात्रय व्ही. जाधव, टेक्निकल एज्युकेशन रिजनल ऑफीस, पुणे | सदस्य |

सदर बैठकीस खालील निमंत्रित विद्याशाखा संचालक उपस्थित होते.

| क्र. | संचालकांची व विद्याशाखा नावे |
|---|---|
| 01 | संचालक, मानव्यवविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा |
| 02 | संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा |
| 03 | संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 04 | संचालक, कृषी विद्याशाखा |
| 05 | संचालक, विज्ञान विद्याशाखा |
| 06 | संचालक, संगणक विद्याशाखा |
| 07 | संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा |
| 08 | संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा |
| 09 | संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र |
| 09 | संचालक, स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग आणि प्रो. राम ताकवले रिसर्च सेंटर |
| 10 | संचालक, संचालक नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य |
| 11 | संचालक, बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा |
| 12 | संचालक, विद्यार्थी सेवा विभाग |

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 45.1.0 | | बैठकीसाठी ऑनलाईन\ऑफलाईन असलेल्या सर्व मा. सदस्यांचे कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी शब्दसुमनांनी स्वागत केले. |
| 45.2.0 | 45.2.1 | दि. 10 जून 2023 रोजी झालेल्या 44 व्या नियोजन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.<br>**ठराव** - कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी सदर कार्यवृत्ताचे वाचन केले. कार्यवृत्तातील ठराव क्रमांक 44.3.3 प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस / सिनिअर अॅकेडमिक कन्सल्टंट / व्यवस्थापकीय संचालक / संचालक पद निर्मिती व भरती प्रक्रिया मान्यतेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निवड प्रक्रिया नियमावलीचा आधार घेऊन दस्तऐवजी (SoP) तयार करण्यात यावी. सदर SoP तयार करताना वरील पदांची कार्यकक्षा, जबाबदारी, सेवा कर्तव्ये, वेतन नियमावली यांचा समावेश करावा असे सुचविण्यात आले. सदर सुचनांना सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 45.2.2 | दि. 10 जून 2023 रोजी झालेल्या 44 व्या नियोजन मंडळ बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.<br>**ठराव** - दि. 10 जून 2023 रोजी झालेल्या 44 व्या नियोजन मंडळ बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीच्या अहवालाचे सदस्य सचिव यांनी वाचन केले. कार्यवाहीचा अहवाल सर्वानुमते मंजुर करण्यात आला. |
| | | पुणे येथील बोपोडी येथील जागा विद्यापीठाला शैक्षणि बाबी, स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करण्यासाठी भाडे करार पद्धतीने मिळाली आहे. त्यासाठी भरीव प्रयत्न केल्याबद्दल नियोजन मंडळाच्या सर्व सदस्यांनी मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले. |
| 45.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |

| | | |
|---|---|---|
| | 45.3.1 **विद्यार्थी सेवा विभाग** | **विषय** – सद्यस्थितीतील अभ्यासकेंद्र, नव्याने द्यावयाचे अभ्यासकेंद्र यासंबंधीचे धोरण माहितीस्तव व मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – वरील विषयावर चर्चा होऊन नवीन अभ्यासकेंद्रे देताना तसेच जुने अभ्यासकेंद्र सुरू ठेवणेविषयी सर्व विद्याशाखांसाठी समान धोरण असावे. समान धोरण ठरविण्यासाठी व अंमलबजावणीसाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासाठी एक उपसमिती स्थापन करून विद्याशाखानिहाय आणि शिक्षणक्रमनिहाय एक प्रश्नावली तयार करावी. सदर प्रश्नावली विद्यार्थी सेवा विभागाला देण्यात यावी. उपसमितीमध्ये सहसंचालक डॉ. बच्छाव, विद्याशाखा संचालक, नियोजन अधिकारी यांचा समावेश करावा.<br>तसेच संगणक विद्याशाखा व विज्ञान विद्याशाखेने विद्यापीठ अनुदान आयोगाचे निकष येण्यापूर्वी (2020पूर्वी) विद्यापीठाने वेळोवेळी ठरविलेल्या निकषांनुसार दिलेल्या अभ्यासकेंद्रांचे नुतनीकरण करताना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेले सध्याचे निकष पूर्ण करण्याचा आग्रह धरण्यात येऊ नये. जुन्या अभ्यासकेंद्राचे नूतनीकरण करताना कागदपत्रे पडताळणी, अभ्यासकेंद्राच्या मागील कामगिरीचा आढावा घेऊन विद्याशाखा संचालकांनी निर्णय घ्यावा असे ठरले.<br>तसेच नवीन अभ्यासकेंद्र देताना विद्यापीठ अनुदान आयोगाचे निकषांनुसार अभ्यासकेंद्र मान्यता देण्यात यावी असे सुचित केले. या सुचनेला सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 45.3.2 **स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग** | **विषय** – स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंगतर्फे तीन प्रमाणपत्र शिक्षणक्रम जानेवारी 2025 पासून सुरू करण्याचा विचार आहे.<br>**ठराव** – जानेवारी 2025 पासून सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांचे प्रोग्राम प्रपोजल फॉर्म (PPF) नियोजन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर करण्यात आले. सदर प्रोग्राम प्रपोजल फॉर्मला नियोजन मंडळाने कार्योत्तर मान्यता दिली. |
| | 45.3.3 **निरंतर शिक्षण विद्याशाखा** | **विषय** – सन 2023-24 मध्ये निरंतर शिक्षण विद्याशाखेमार्फत राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही तसेच 2024-25 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी, सद्यस्थितीतील अभ्यासकेंद्रे यांना नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – निरंतर शिक्षण विद्याशाखेच्या विषयाला नियोजन मंडळाने मान्यता दिली. |
| | 45.3.4 **आरोग्य विज्ञान विद्याशाखा** | **विषय** – सन 2023-24 मध्ये आरोग्य विज्ञान विद्याशाखेमार्फत राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही तसेच 2024-25 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी, नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – आरोग्य विज्ञान विद्याशाखेच्या विषयाला नियोजन मंडळाने मान्यता दिली. |
| | 45.3.5 **शिक्षणशास्त्र विद्याशाखा** | **विषय** – 2024-25 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – शिक्षणशात्र विद्याशाखेच्या विषयांना मान्यता दिली. एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रांसाठी विद्याशाखेने पुढाकार घेऊन नागपूर, रायगड, परभणी, पुणे येथील पात्र शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडे त्यांनी अभ्यासकेंद्रांसाठी मागणी अर्ज करण्याची प्रक्रिया करावी.<br>एम.ए. पालकत्व (M.A. Parenting), त्यासाठी भारतीय पालकत्वाचा व इतर संकल्पनांचा अंतर्भाव करावा.<br>उच्च शिक्षण पदविका शिक्षणक्रम (Dip. In Higher Education) हे शिक्षणक्रम विद्याशाखेने नव्याने विकसित करण्यात यावेत. त्याचा प्रस्ताव करून पुढील विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर करावा. अशा सूचना करून विद्याशाखेच्या नियोजन मंडळाने मान्यता दिली. |
| | 45.3.6 **संगणक विद्याशाखा** | **विषय** – सन 2023-24 मध्ये संगणक विद्याशाखेमार्फत राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही, 2024-25 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी, सद्यस्थितीतील अभ्याकेंद्रे व त्यासंबंधीचे धोरण, शिकणे-शिकविणे-मूल्यमापन याबाबतचे नियोजन आणि 2024-25 मध्ये नव्याने राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांसाठीच्या PPR, PPF, PDF आणि PRF Forms नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये राबविण्यात आलेले शिक्षणक्रमांची ,वर्ष 2024-25 मध्ये सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची आणि त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली .सद्यस्थितीतील अभ्यासकेंद्रे व नव्याने द्यावयाची अभ्यासकेंद्रे यासंबंधीच्या धोरणाची नोंद घेण्यात आली .नाशिकमधील जेएमसीटी पॉलिटेक्निकने ( 54436 ) एमसीए शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र बंद करण्याचा निर्णय डिसेंबर 2021 मध्ये घेतल्याने तेथील विद्यार्थ्यांची सोय व्हावी |

| | | |
|---|---|---|
| | | म्हणून विद्याशाखेंतर्गत अभ्यासकेंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि YCMOU MCA STUDY CENTRE (54491) हे अभ्यासकेंद्र सुरू करण्यात आले .2022 मध्ये बीसीए शिक्षणक्रमही या केंद्रावर सुरू करण्यात आलाविद्याशाखेमार् .फत सुरू करण्यात आलेल्या या अभ्यासकेंद्रास विद्वत परिषदेची मान्यता घेण्यात यावी आणि भविष्यात विद्याशाखेमार्फत सुरू होणाऱ्या सर्व शिक्षणक्रम या अभ्यासकेंद्रावर उपलब्ध करून देण्यात यावेत .दरवर्षी प्रवेश सुरू होण्यापूर्वी सर्व अभ्यासकेंद्रांची ऑनलाईन बैठक घेऊन नव्याने प्रवेश देण्याची अभ्यासकेंद्रांची तयारी असल्याची खात्री करून तेवढ्याच अभ्यासकेंद्रावर नवीन प्रवेश सुरू करण्यात यावेत. शिकणे) मूल्यमापन-शिकवणे-Teaching / Learning / Evaluation) याबाबतच्या नियोजनाची नोंद घेण्यात आली .संगणकशास्त्र विद्याशाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र आणि पदवी शिक्षणक्रमासाठी अध्ययन अध्यापनासाठी , प्रोजेक्टसाठी यशेक्स वापरण्यास मान्यता देण्यात आली .Master of Computer Applications आणि B.Sc. (Data Science) या शिक्षणक्रमांच्या PPR, PPF आणि PDF ला मान्यता देण्यात आलीप्रमाणपत्र आणि पदविका . शिक्षणक्रमांसाठीहीPPR, PPF, PDF आणि PRF तयार करण्यात यावेत असे सुचित करण्यात आले. |
| | **45.3.7**<br>**वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा** | **विषय** – वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेमार्फत B.A. Facility Services Management, B.B.A. (Accounting & Financial Management), B.B.A. (Event Management) तसेच Ph.D. in Commerce & Management (Regular Mode) हे तीन शिक्षणक्रम 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून सुरु नव्याने राबविण्यास मान्यता मिळाली. सदर शिक्षणक्रमांचे PPR, PPF, PDF आणि PRF Forms नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – वरील शिक्षणक्रमांचे PPR, PPF, PDF आणि PRF Forms ना नियोजन मंडळाने मान्यता दिली. |
| | **45.3.8**<br>**मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा** | **विषय** – मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेमार्फत 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून 1 जून 2024 पासून सुरू होणाऱ्या नवीन M.A. English, M.A. Mass Communication & Journalism, M.A. Political Science, M.A. Sociology, M.A. Psychology हे पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम सुरू करण्याचा विषय संमत केला. सदर शिक्षणक्रमांचे PPR, PPF, PDF आणि PRF Forms नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – विषयामध्ये नवीन शैक्षणिक धोरण असलेला उल्लेख वगळावा व विषयात दुरुस्ती करावी असे संचालकांनी सुचित केले. त्यास नियोजन मंडळाने मान्यता दिली. दुरुस्त विषयानुसार वरील शिक्षणक्रमांचे PPR, PPF, PDF आणि PRF Forms ला नियोजन मंडळाने मान्यता दिली. |
| | **45.3.9**<br>**शिक्षणशास्त्र विद्याशाखा** | **विषय** – शिक्षणशास्त्र पदवी Bachelor of Education (B.Ed.) शिक्षणक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदवीनंतरची अतिरिक्त पदविका यांसाठी आवश्यक टक्केवारीचा विचार करून बिंदूश्रेणींमध्ये सुधारणा सुचविण्यात आली. सदर सुधारणेचा विचार करून गुणपत्रिकेत बिंदूश्रेणींचा उल्लेख करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. विद्याशाखेने शिक्षणशास्त्र पदवी Bachelor of Education (B.Ed.) सादर केलेल्या PPR, PPF, PDF आणि PRF Forms नियोजन मंडळाकडे मान्यतेस्तव सादर<br>**सुधारित विषय** – शिक्षणशास्त्र पदवी Bachelor of Education (B.Ed.) शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पंचबिंदू, सप्तबिंदू आणि सध्या दशबिंदूप्रमाणे अतिरिक्त गुण पंचबिंदूप्रमाणे देण्याविषयीची मान्यतेचा प्रस्ताव.<br>**ठराव** – विषयाच्या आशयामध्ये संचालकांनी सुधारणा सुचविली. सदर सुचनेनुसार विषयातील आशयात सुधारणा करण्यास मान्यता दिली. सुधारून सुधारीत विषयाला तसेच विद्याशाखेने सादर केलेल्या PPR, PPF, PDF आणि PRF Forms नियोजन मंडळाने मान्यता दिली. |

| | | |
|---|---|---|
| | 45.3.10 **आरोग्य विज्ञान विद्याशाखा** | **विषय** – आरोग्य विज्ञान विद्याशाखेमार्फत नवीन शैक्षणिक धोरणानुसार राबविण्यात येणाऱ्या M.A. Yoga पदव्युत्तर पदवी या नवीन शिक्षणक्रमाला मान्यता देण्यात आली.<br>**ठराव** – वरील शिक्षणक्रमांच्या PPR, PPF, PDF आणि PRF Forms नियोजन मंडळाने मान्यता दिली. |
| | 45.3.11 **विज्ञान विद्याशाखा** | **विषय** – विज्ञान विद्याशाखेमार्फत नवीन शैक्षणिक धोरणानुसार राबविण्यात येणाऱ्या V151 : M.Sc. Mathematics, V152 : M.Sc. Environmental Science, V153 : M.Sc. Physics, V154 : M.Sc. Chemistry, V155 : M.Sc. Zoology & V156 : M.Sc. Botany **या** शिक्षणक्रमांची मान्यता तसेच एकूण 15 शिक्षणक्रम आणि Ph.D. या शिक्षणक्रमाला मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव<br>सुधारित विषय - सन 2023-24 मध्ये विज्ञान विद्याशाखेमार्फत राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही, 2024-25 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी, सद्यस्थितीतील अभ्याकेंद्रे व नवीन अभ्यासकेंद्रांच्या मान्यतेचे धोरण, शिकणे-शिकविणे-मूल्यमापन यांबाबतचे नियोजन, 2023-24 मध्ये राबविलेले शिक्षणक्रम आणि 2024-25 मध्ये नव्याने राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांसाठीच्या PPR, PPF, PDF आणि PRF Forms नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – विषयामध्ये संचालकांनी दुरुस्ती सुचविली. सदर सुधारित विषय संचालकांनी वाचून दाखवला. मा. नियोजन मंडळाने विषयातील आशय दुरुस्तीस मान्यता दिली.<br>विद्याशाखेने मान्यतेसाठी सादर केलेल्या PPR, PPF, PDF आणि PRF Forms ला नियोजन मंडळाने मान्यता दिली. |
| 45.4.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| | 45.4.1 | **कार्योत्तर मान्यतेसाठी कोणताही विषय मंडळाच्या बैठकीत सादर केला नसल्याने निरंक.** |
| 45.5.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय** |
| | 45.5.1 **सभा व दप्तर कक्ष** | **विषय** – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक Amended Draft Statute No. S-2 relating to "Age limit for the post of Pro-Vice Chancellor" या ड्राफ्ट स्टॅट्यूटला नियोजन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभा क्र. 193 दि. 30-04-2024 मध्ये ठेवण्यात आला होता. मा. व्यवस्थापन मंडळाने विषयाला मान्यता देऊन सदर विषय नियोजन मंडळाच्या शिफारशीनुसार विद्यापीठाच्या स्टॅट्यूटमध्ये दुरुस्ती करून सदर ड्राफ्ट स्टॅट्यूट शासनाकडे मान्यतेस्तव सादर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार नियोजन मंडळानेही सदर विषयासा मान्यता दिली आणि . मा. राज्यपाल कार्यालयास मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |
| | 45.5.2 **प्रो. राम ताकवले रीसर्च सेंटर** | **विषय** – प्रा. राम ताकवले संशोधन आणि विकसन केंद्र अंतर्गत Minor Research Project मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – प्रा. राम ताकवले संशोधन आणि विकसन केंद्राअंतर्गत Minor Research Project य.च.म.मुक्त विद्यापीठातील संचालक, प्राध्यापक, व शैक्षणिक संयोजक यांच्याकडून प्राप्त झालेल्या 33 MRP Proposal चे अवलोकन करण्यात येऊन समितीमार्फत पुढील कार्यवाही साठी मान्यता देण्यात आली. प्रस्ताव मूल्यमापनासाठी केलेल्या समितीस मान्यता देण्यात आली मा. कुलगुरू यांनी समाज आणि विद्यापीठास उपयुक्त संशोधन प्रस्तावास प्राधान्य देण्यात यावे अशा मार्गदर्शक सूचना दिल्या. तसेच Minor Research Project मान्यतेसाठीची नियमावली मान्य करण्यात आली . MRPसाठी तरतूद करण्यात आलेल्या खर्चासही मान्यता देण्यात आली. |
| | 45.5.3 **विद्यार्थी सेवा विभाग** | **विषय** – सर्व विद्याशाखांच्या सर्व शिक्षणक्रमांसाठी दिली जाणारी अभ्यासकेंद्रे, विद्यार्थी संख्येनिहाय मान्यतेबाबतचा धोरणात्मक निर्णय<br>**ठराव** – सद्यस्थितीतील विद्याशाखानिहाय, शिक्षणक्रमनिहाय अभ्यासकेंद्रांची यादी विद्यार्थी सेवा विभागाकडून नियोजन अधिकाऱ्यांना 10 दिवसांत देण्यात यावी. एखाद्या अभ्यासकेंद्रावर मान्य विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थीसंख्येची नोंदणी होत असल्यास मान्य विद्यार्थी संख्या झाल्यानंतर लगेच सॉफ्टवेअरमध्ये क्लोजींगची सोय असण्याबाबतची दुरुस्ती सॉफ्टवेअरमध्ये विद्यार्थी सेवा विभागाने करून घ्यावी असा निर्णय घेण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| | 45.5.4<br>सर्व<br>विद्याशाखा | **विषय** – सर्व विद्याशाखांच्या सर्व शिक्षणक्रमांसाठी दिली जाणारी अभ्यासकेंद्रे, विद्यार्थी संख्येनिहाय तसेच समंत्रकांनिहाय मान्यतेबाबतचा धोरणात्मक निर्णय<br>**ठराव** – मान्य अभ्यासकेंद्रांवर विद्यार्थी संख्येनिहाय तुकड्यांची नोंदणी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाचे निकष लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या नोंदणीनुसार आवश्यक संमंत्रक संख्या असणे गरजेचे आहे. बदलत्या काळानुसार प्रत्यक्ष संमंत्रक संख्येला पर्याय म्हणून ऑनलाईन मेंटॉर संकल्पना यांबाबत चर्चा करण्यात आली. ऑनलाईन मेंटॉरसाठी एक SoP तयार करण्यात यावी. ऑनलाईन मेंटॉर प्रशिक्षणाचे काम डॉ. कविता साळुंके यांनी पहावे असे सुचित करण्यात आली. या सुचनेला नियोजन मंडळाने मान्यता दिली. |
| | 45.5.5<br>सर्व<br>विद्याशाखा | **विषय** – सर्व विद्याशाखांच्या सर्व शिक्षणक्रमांच्या पाठ्यपुस्तके लिखाणासाठी दिले जाणारे मानधन यात Uniform Policy असावी यासाठी नियमावली मान्यतेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी नियोजन मंडळात चर्चेसाठी सादर<br>**ठराव** – सदर विषयाबाबत सर्व विद्याशाखा संचालकांनी अभ्यासक्रम लिखाणासाठी, भाषा संपादन, आशय संपादन, यांसाठी देण्यात येणारे मानधन हे क्रेडिट पॉईंटनुसार दिले जाते. तरीही त्यात तफावत आहे. सदर तफावत दूर करण्यासाठी IGNOU निकषांचा अभ्यास करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 प्रमाणे पदवी, पदव्युत्तर पदवीच्या स्वयं-अध्यापन साहित्य लेखक,संपादक मानधन श्रेयांकांनुसार (लेखी, प्रात्यक्षिक, संशोधन कार्य, आंतरवासिता, क्षेत्रीय कार्य, कोर्स वर्क निहाय, इत्यादी) मानधन ठरविण्यासाठी उपसमिती गठीत करण्यात यावी. या समितीमध्ये डॉ. पाटोळे, वित्त अधिकारी, डॉ. कामळसकर यांचा समावेश असावा. या समितीने अभ्यासपूर्ण अहवाल सादर करावा असे सुचित करण्यात आले. |
| | 45.4.6<br>कृषी<br>विद्याशाखा | **विषय – कृषी विद्याशाखेचे दि. 29 जून रोजी झालेल्या विद्याशाखेच्या परिषदेचे इतिवृत् मान्यतेस्व सादर**<br>**ठराव** – कृषी विद्याशाखेच्या संचालकांनी 29 जून 2024 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेत चर्चा झालेल्या विषयांचे सादरी करण केले. विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 45.4.7<br>व्यावसायिक<br>शिक्षण आणि<br>कौशल्य<br>विकास<br>विद्याशाखा | **विषय** – विद्याशाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या Digital Marketing आणि Entrepreneurship Development या पदवी शिक्षणक्रमांसाठी PPF, PDF Forms तयार करण्यात आले .सदर Forms मान्यतेस्तव सादर.<br>**ठराव** – विद्याशाखेने सादर केलेल्या Digital Marketing आणि Entrepreneurship Development या पदवी शिक्षणक्रमांच्या PPF, PDF Forms ला मान्यता देण्यात आली. तसेच ही विद्याशाखा नव्याने स्थापन झाल्यामुळे विद्याशाखा परिषद गठीत करण्याविषयी सुचविण्यात आले. |
| | 45.4.8<br>वाणिज्य<br>व्यवस्थापन<br>विद्याशाखा | **विषय** – विद्याशाखेमार्फत ऑनलाईन बी.बी.ए. व एम.बी.ए. शिक्षणक्रम सुरू करणेविषयीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर<br>**ठराव** – सध्या विद्याशाखेमार्फत ऑफलाईन पद्धतीने बी.बी.ए. व एम.बी.ए. शिक्षणक्रम राबविण्यात येत आहे. तसेच विद्यापीठातील कमवा व शिका योजनेअंतर्गत बी.बी.ए. शिक्षणक्रम सुरु आहे. सदर दोन्ही शिक्षणक्रम BVG यांचेशी सामंजस्य करार करून 2025-26 सुरू करण्यास नियोजन मंडळाने मान्यता दिली. |
| | 45.4.9<br>निरंतर<br>शिक्षण<br>विद्याशाखा | **विषय** – विद्यापीठात स्पर्धा परीक्षा केंद्राची स्थापना करण्यास मान्यता देणेविषयी<br>**ठराव** – विविध स्पर्धा परीक्षांसाठी महाराष्ट्रातून अनेक विद्यार्थी सहभागी होतात. त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करणे, समन्वयन करणे, याबाबतचे नियोजन, इयादी बाबतची जबाबदारी निरंतर शिक्षण विद्याशाखेने घ्यावी असे ठरले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 45.4.10<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **विषय** – Ph.D. शिक्षणक्रमाच्या प्रवेश नियमावलीस विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांनुसार मान्यता मिळणेबाबत<br>**ठराव** – विद्यापीठातील विविध विद्याशाखांमध्ये नियमित पद्धतीने Ph.D. शिक्षणक्रम सुरु करण्यात यावा त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे UGC Public Notice No.F.4-1(UGC-NET Review Committee)/2024(NET)/140648, March 27, 2024/) नियमानुसार शेक्षणिक वर्ष 2024-25 या शैक्षणिक वर्षात प्रवेश प्रक्रियेसाठी सादर केलेल्या नियमावलीस मान्यता देण्यात आली. |
| | 45.4.11<br>आस्थापना कक्ष | **विषय** – विविध शैक्षणिक संयोजक पदांच्या भरतीस मान्यतेबाबत ...<br>**ठराव** – विद्यापीठातील नवीन विद्याशाखा स्थापन झालेल्या आहेत. तसेच विविध विद्याशाखांमधून विविध नवीन शिक्षणक्रम विकसित करण्यात येत आहेत. बाहेरील संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. विविध शैक्षणिक कामे तसेच अभ्यासकेंद्रांशी संपर्क, नियोजन करण्यासाठी सर्व विद्याशाखा संचालकांनी आवश्यक शैक्षणिक संयोजक पदांच्या भरतीबाबतचा प्रस्ताव 7 दिवसांत मा. कुलगुरूंना सादर करावा. |

**अध्यक्ष** **सदस्य सचिव**

**नियोजन मंडळ** **नियोजन मंडळ**